**श्री क्षेत्र विठ्ठल-रुख्मिणी मंदिर, पंढरपूर, जि. सोलापूर येथे भाविक आणि पर्यटकांना सेवा-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : टिडीएस-२०२४/०७/प्र.क्र.०७/पर्यटन-२,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक : १० ऑक्टोबर, २०२४.**

**संदर्भ :** १) जिल्हा नियोजन समिती, सोलापूर यांचे पत्र क्र.जिनिस/पांआवा/स.सं.अ.१/२०२४-२५/१२८१, दि.१६/०७/२०२४.

२) सहायक संचालक पर्यटन संचालनालय यांचे पत्र क्र.पसं/विकास/ श्री क्षेत्र पंढरपुर /४/प्र.क्र.१६५/२०२४/३०७९, दि.१६/०७/२०२४.

३) मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची दि.१६/०८/२०२४ रोजीची बैठक.

४) मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.२४/०९/२०२४ रोजी झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीतील निर्देश.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्यामध्ये पर्यटन विकसित करुन त्याद्वारे स्थानिक अर्थव्यवस्था वृद्धिंगत करण्याकरीता आणि स्थानिकांना रोजगाराची संधी निर्माण करण्यास मोठा वाव असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेऊन तसेच महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत असलेल्या श्री विठ्ठल- रुख्मिणी मंदिर, पंढरपूर येथे यात्रा कालावधी दरम्यान तात्पुरत्या स्वरुपात उभा करण्यात येणारा दर्शनमंडप आणि दर्शनरांग याकरीता कायमस्वरुपी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने जिल्हा नियोजन समिती, सोलापूर यांनी संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१६/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावास मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील दि.२४/०९/२०२४ रोजी झालेल्या राज्यस्तरीय शिखर समितीच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली. त्यानुषंगाने श्री विठ्ठल- रुख्मिणी मंदिर, पंढरपूर येथे कायमस्वरुपी दर्शनमंडप आणि दर्शनरांग करणेकरीता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

श्री विठ्ठल-रुख्मिणी मंदिर, पंढरपूर येथे कायमस्वरुपी दर्शनमंडप आणि दर्शनरांग करण्याबाबतच्या रु.१२९.४९ कोटी (रुपये एकशे एकोणतीस कोटी एकोणपन्नास लक्ष फक्त) रकमेच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून रु. १३.०० कोटी (रुपये तेरा कोटी फक्त) इतका निधी वितरीत करण्यास सदर शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत असून प्रकल्पात नमुद अंदाजपत्रकातील कामाच्या बाबी व त्यांचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

**(रु. कोटीत)**

| **अ.क्र.** | | **तपशिल** | **मुळ प्रशासकीय मान्यता** | **वितरीत करावयाचा निधी** |
|---|---|---|---|---|
| १ | दर्शन मंडप - मुलभूत सुविधा व इलेक्ट्रिकल वर्क सहित | १) क्षेत्र :१६१८५ चौ. मी. (Stilt Floor- ५८१७ चौ. मी., Ground Floor चौ. मी ४९२३, First Floor चौ. मी ४९२३, Second Floor चौ. मी ५२२)<br>२) इतर मुलभूत सुविधा (Water Harvesting, CCTV, Security system, Public addressing system, Organic waste converter, Sewage management system ) | ८७.३१ | १३.०० |
| २ | दर्शन रांग (स्कायवॉक) सर्व सुविधायुक्त व इलेक्ट्रिकल वर्क सहित | १) १०५० मी. लांब<br>२) २ मी. रूंद<br>३) ७ मी उंच (जमिनीपासून ४ मी. उंच)<br>४) इतर मुलभूत सुविधा | ४२.१८ | |
| **एकूण** | | | **१२९.४९** | **१३.००** |

**०२** वरील विवरणपत्रामध्ये नमूद केल्यानुसार विषयांकित कामाच्या रु. **१२९.४९** कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता आणि त्यापैकी रु.१३.०० कोटी इतका निधी सन २०२४-२५ या वित्तीय वर्षात खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहुन वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद झाल्याशिवाय प्रत्यक्ष कामास सुरवात करू नये.
२. नियोजित जागा ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.
३. आवश्यक त्या प्रमाणपत्रांना नगरपालिका, तत्सम प्राधिकरणे इ. यांची मंजुरी आणि “ना हरकत प्रमाणपत्रे” बांधकाम सुरू करण्यापूर्वी प्राप्त करण्यात यावी प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१, दि.१० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
४. अंदाजपत्रकातील तरतुदी ढोबळ स्वरुपात धरण्यात असल्याने सदर तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुन त्यास सक्षम स्तरावरुन तांत्रिक मान्यता घेऊनच काम हाती घ्यावे.
५. स्थापत्य कामांच्या कालावधीतच विद्युतीकरणाबाबत तसेच इतर अनुषंगिक कामांचे योग्य नियोजन करुन सदर कामे पूर्ण करावीत.

६. सदर प्रकल्पाचे बांधकाम हे **सार्वजनिक बांधकाम विभागा**मार्फत करण्यात यावे. सदर बांधकामाचा खर्च हा पर्यटन विभागामार्फत अदा करण्यात येईल.

७. वितरीत केलेल्या निधीतून खर्च करताना वित्तीय नियमांचे आणि विविध नियमांतर्गत नेमून दिलेल्या कार्यपध्दतीचे पालन करण्यात यावे.

८. कोणत्याही परिस्थितीत मंजूर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च झाल्यास त्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, सोलापूर यांची राहील व जादा खर्चाप्रित्यर्थ जादा अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

९. पर्यटन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून केलेल्या कामाच्या ठिकाणी सदर कामे पर्यटन विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या निधीमधून केली असल्याबाबतचे फलक लावण्यात यावेत.

१०. या कामाबाबत करावयाच्या बांधकामासंदर्भात अथवा खरेदीबाबत किंवा सेवा पुरवठा कराराबाबत वित्तीय नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यपध्दती पाळणे आवश्यक आहे या संदर्भात शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक-संकीर्ण-१००२/प्र.क्र.१५/कोषा-प्र-५ दि.०६/०२/२००२ रोजीच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल, याची खबरदारी संबंधित अंमलबजावणी यंत्रणेने घ्यावी. तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्र. बीजीटी- १०.००/ प्र.क्र.५६/२००० /वित्तीय सुधारणा, दि.१०/०९/२००१ मधील उपाययोजनांची अंमलबजावणी तंतोतंतपणे करण्यात यावी. तसेच प्रकल्पाची अंमलबजावणी करताना आवश्यक त्या तांत्रिक बाबीशी संबंधित मान्यता विहित स्तरावर घेण्यात याव्यात.

११. सदर निधीतून करावयाच्या कामांची भौतिक प्रगती तसेच निधीतून होणा-या खर्चाची मासिक विवरणपत्रे दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास पर्यटन संचालनालयामार्फत न चुकता शासनास सादर करावीत.

१२. गुणनियंत्रण यंत्रणेद्वारे कामाची प्रत्यक्ष गुणवत्ता तपासणी केल्याचा प्रमाणित अहवाल तसेच काम पूर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचा सचित्र दाखला आणि निधीबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र न चुकता संचालनालयामार्फत शासनास सादर करण्यात यावे. तद्नंतर पुढील उर्वरित निधी वितरित केला जाईल.

१३. सदर काम पूर्ण झाल्यानंतर सदर कामाच्या देखभालाची तसेच इतर अनुषंगिक कामांची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणा व संबंधित संस्था यांची राहील.

१४. यापूर्वी या मंदीरातील विविध कामाकरीता, नगर विकास विभाग, नियोजन विभाग, जिल्हा नियोजन मंडळ व इतर कोणत्या योजनेतून रक्कम घेतली गेली नाही, याबाबत नियंत्रण अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांनी खातरजमा करावी.

१५. पर्यटन विभागाशिवाय इतर कोणत्या विभागातून याच प्रकल्पातील इतर कामासाठी निधी मंजूर झाला असल्यास, या प्रकल्पातील कामे शासनाच्या निदर्शनास आणून, ती कामे / बाबी करण्यात येऊ नयेत.

१६. कामाची द्विरुक्ती होणार नाही याची खातरजमा जिल्हाधिकारी आणि प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा यांनी करुन प्रमाणित करुन घ्यावे.

१७. प्रकल्पातील कामे करताना प्राथम्य क्रमांक निश्चित करुन कामे करणेत यावीत. सरसकट एकत्रित कामे सुरु करु नयेत. जेणेकरुन पर्यटक, भाविकांना गैरसोय होणार नाही.

१८. प्रकल्पातील कामे करताना शासनाच्या निविदा विषयक बाबीसंदर्भात प्रचलित नियमानुसार कार्यवाही करावी. याबाबत प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेने दक्षता घ्यावी.

१९.

**०३** वरील प्रयोजनार्थ करावयाच्या टप्पे निहाय्य निधी ही त्या-त्या वित्तीय वर्षातील मंजुर तरतूदीतुन मुख्यलेखाशीर्ष "**मागणी क्रमांक झेडडी-४, ३४५२ पर्यटन, पर्यटनासाठी पायाभूत सुविधा, १०१ पर्यटन केंद्रे (०२) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना, (०२) (१८) पर्यटन विकासासाठी विविध ठिकाणांसाठी मूलभूत सुविधांकरीता अनुदाने (३४५२ १९५८) ३१-सहायक अनुदाने** या लेखाशिर्षाखालील रु. १३.०० कोटी इतका निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**०४** या प्रकरणी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम संबंधितांना वितरीत करण्याकरीता जिल्हा नियोजन अधिकारी, सोलापूर यांना आहरण व संवितरण अधिकारी व जिल्हाधिकारी, सोलापूर यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

**०५** सदर निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम त्यांनी अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, सोलापूर/ संबंधित जिल्हा कोषागार कार्यालयात देयके सादर करुन संबंधितांना वितरीत करण्यात यावी, सदर कार्यवाहीबाबतचा सचित्र अनुपालन अहवाल शासनास एक महिन्यात सादर करण्यात यावा.

**०६** प्रमाणित करण्यात येते की, वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२४/प्र.क्र ८०/अर्थ-३. दि. २५/०७/२०२४ अन्वये देण्यात आलेल्या सुचनेनुसार व अधिकारांच्या मर्यादित सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येते असून परिशिष्टामधील तपासणीसूची बाबींची व अटींची पूर्तता करण्यात आली आहे.

**०७** सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४१०१०१९३०३१९५२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

VIJAY KRISHNAJI POWAR

Digitally signed by VIJAY KRISHNAJI POWAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=6025de7b13988d94d1eecfb49a0340513e42c24ce3be412461b51e80fce8dca2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B617840E527F8E8001C6EF57BCFD0B24E5D76A1EC2405C91DE7D99110EAF5DAF, cn=VIJAY KRISHNAJI POWAR
Date: 2024.10.10 19:17:07 +05'30'

**(विजय कृष्णाजी पोवार)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा. मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
७. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.

८. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. सचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय मुंबई.
११. संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. जिल्हाधिकारी, सोलापूर.
१३. निवडनस्ती (पर्यटन-२)